माहितीचा अधिकार

महापारेषण

महाराष्ट्र राज्य विदयुत पारेषण कंपनी मर्यादीत.

(CIN No.U40109MH2005SGC153646)

**प्रेषक,**
कार्यकारी अभियंता, म.रा.वि.पा.कं.मर्या.,अउदा संवसु विभाग सांगली
प्रशासकीय इमारत,विश्रामबाग,ता.मिरज,जि.सांगली- ४१६४१५
**कार्यालयीन क्रमांक** -०२३३-२३०५८१६(का)
०२३३-२३०४८७२ (वै)
**E-mail ID**- ee3120@mahatransco.in

का.अ/अउदा/संवसु/वि/सांगली/मासं / No 01208 दिनांक: 27 SEP 2024

# प्रसिध्दीपत्रक

**विषय :- शिकाऊ उमेदवार प्रशिक्षण भरती २०२४ करिता अर्ज सादर करण्यास वाढीव कालावधी देण्याबाबत.**

**संदर्भ :- काअ/अउदा संवसु विभाग/सांगली/मासं/१०६७ दिनांक ०२.०९.२०२४**

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित, कार्यकारी अभियंता, अउदा संवसु विभाग सांगली अंतर्गत आय.टी.आय. वीजतंत्री शिकाऊ उमेदवार भरती प्रक्रिया २०२४ संदर्भिय जाहिरात प्रसिध्द करणेत आलेली आहे. सदर जाहिरातीत नमुद केल्यानुसार ऑनलाईन अर्ज सादर करण्यासाठी शेवटची मुदत दिनांक १७.०९.२०२४ होती.

तथापि, आय. टी. आय वीजतंत्रीचा वार्षिक निकाल दि.१५.०९.२०२४ रोजी जाहीर झालेला असल्याने, उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना ऑनलाईन अर्ज सादर करणेकरिता पूरेसा कालावधी मिळालेला नाही.

त्यामुळे सर्व प्रकारच्या उमेदवारांसाठी ऑनलाईन अर्ज सादर करणेकरिता दि. २८.०९.२०२४ पासुन दि. ३०.०९.२०२४ पर्यंत वाढीव कालावधी देण्यात येत आहे. तरी पात्र उमेदवारांनी दि. २८.०९.२०२४ ते दि. ३०.०९.२०२४ चे रात्री २३.५९ वाजेपर्यत तीन दिवसाच्या वाढीव कालावधीमध्ये www.apprenticeshipindia.gov.in या संकेतस्थळावर आस्थापना क्र. E09162700112 वर नोंदणी करुन सर्व आवश्यक कागदपत्रे अपलोड करुन ऑनलाईन अर्ज करावेत.

संदर्भिय जाहिरातीमध्ये प्रसिध्द झालेल्या शिकाऊ उमेदवार भरती संदर्भातील इतर अटी व शर्ती यामध्ये कोणताही बदल होणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

एस.एम.पुजारी
कार्यकारी अभियंता
अउदा संवसु विभाग सांगली

माहितीचा अधिकार

महापारेषण
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

महाराष्ट्र राज्य विदयुत पारेषण कंपनी मर्यादीत.

(CIN No.U40109MH2005SGC153646)

प्रेषक,
कार्यकारी अभियंता, म.रा.वि.पा.कं.मर्या.,
अउदा संवसु विभाग सांगली
प्रशासकीय इमारत,विश्रामबाग,ता.मिरज,जि.सांगली– ४१६४१५
कार्यालयीन क्रमांक – ८९५६८८८११६
०२३३–२३०४८७२ (वै)
E-mail ID- ee3120@mahatransco.in

का.अ/अउदा/संवसु/वि/सांगली/मासं/ No 01067 दिनांक:- 2 SEP 2024

## जाहीर नोटीस

महापारेषण अउदा संवसु विभाग,सांगली अंतर्गत शिकाऊ उमेदवारी कायदा १९६१ नुसार शिकाऊ उमेदवार म्हणून सन २०२४–२०२५ करीता वीजतंत्री (Electrician)या ट्रेडमध्ये भरती प्रक्रिया राबविण्यात येत आहे.

सदर शिकाऊ उमेदवारी भरती प्रक्रियेसाठी शासनाच्या www.apprenticeshipindia.gov.in या संकेतस्थळावर अउदा संवसु विभाग,सांगली च्या खालील आस्थापना रजिस्ट्रेशन क्रमांकावर ऑनलाईन अर्ज सादर करणे गरजेचे आहे. ऑनलाईन अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत दि.१७.०९.२०२४ (२३.५९) पर्यंत राहिल. त्यानंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा शिकाऊ उमेदवारी भरती प्रक्रियेसाठी विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी. वीजतंत्री (Electrician)शिकाऊ उमेदवारांचा प्रशिक्षण कालावधी हा अधिनियमानुसार १ वर्षाचा राहिल. ऑनलाईन अर्जासाठी आवश्यक माहिती खालील अस्थापनेच्या नावे नोंदणी क्रमांकावर करणेत यावी.

| अस्थापनेचा रजिस्ट्रेशन क्रमांक | ट्रेड | एकुण |
|---|---|---|
| Location : EHV O&M DIVISION, SANGLI E09162700112 | वीजतंत्री(Electrician) | एकुण जागा– ३८ |

१) शैक्षणिक अर्हता– महाराष्ट्र राज्य माध्यमिक शालांत परिक्षा किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे व राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद (NCTVT)नवी दिल्ली मान्यताप्राप्त औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतून वीजतंत्री या व्यवसाय परिक्षेत उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

२) विद्यावेतन शासनाच्या नियमाप्रमाणे लागु राहिल.

३) पदसंख्या कमी किंवा जास्त करण्याचा व भरती प्रक्रियेशी निगडीत असलेले व सर्व निर्णय घेण्याचा अधिकार व्यवस्थापनाकडे राखीव असतील व सदरचे निर्णय उमेदवारास कळविणे व्यवस्थापनास बंधनकारक राहणार नाही. भरती प्रक्रीयेचे ठिकाण अउदा संवसु विभाग सांगली.

४) शिकाऊ उमेदवारी भरती प्रक्रियेसाठी आरक्षण शासनाच्या विविध नियमानुसार लागु राहिल.

५) ऑनलाईन अर्ज सादर करताना एस.एस.सी उत्तीर्ण गुणपत्रिका व आयटीआय उत्तीर्ण गुणपत्रिका यामध्ये नमुद केलेले नाव व आधारकार्डवर नमुद केलेल्या नावाशी सुसंगत आहे किंवा कसे याची पडताळणी करून माहीती भरावी.

६) एस.एस.सी गुणपत्र/प्रमाणपत्र व आयटीआय उत्तीर्ण गुणपत्र/प्रमाणपत्र (चारही सेमिस्टरची) साक्षांकित प्रत ऑनलाईन अर्जामध्ये अपलोड करणे आवश्यक आहे.

७) शिकाऊ उमेदवारांची सही, पालकाची सही, प्रवर्ग, जन्मतारीख, एस.एस.सी. मार्क, आयटीआय मार्क ही माहीती अचुक भरण्यात यावी. सदर माहिती उपलब्ध न झाल्यास उमेदवारांच्या शिकाऊ उमेदवारी भरती प्रक्रियेसाठी विचार केला जाणार नाही.

८) शिकाऊ उमेदवारी भरती प्रक्रिये दरम्यान उमेदवाराने राजकीय किंवा इतर अधिका–याकडुन दबाव आणल्यास संबंधित उमेदवाराची उमेदवारी रद्द करणेत येईल याची नोंद घ्यावी.

९) शिकाऊ उमेदवारानी ऑनलाईन (Online) अर्ज करताना पोर्टलवर फोटो, मुळ प्रमाणपत्रांची सुस्पष्ट स्कॅन करून योग्य रितीने ऑनलाईन (Online) अर्ज सादर करावा. फोटो अथवा मुळ प्रमाणपत्र सुस्पष्ट नसेल तर अशा अर्जाचा विचार केला जाणार नाही, यांची नोंद घ्यावी.

१०) वयोमर्यादा १८ ते ३० वय वर्षे (मागासवर्गीयांसाठी ०५ वर्ष शिथिलक्षम)

११) ऑनलाईन (Online) अर्ज सादर करताना उमेदवाराने सदयस्थितीत कार्यान्वित असणारा Email-ID व भ्रमनध्वनी क्रमांक कार्यान्वित नसल्यामुळे संपर्क करणे शक्य झाले नाही तर त्याची पुर्ण जबाबदारी उमेदवारांवर राहील.

१२) दि.१७.०९.२०२४ नंतर ऑनलाईन नोंदणी केलेल्या उमेदवारांचा शिकाऊ उमेदवारी भरती प्रक्रियेसाठी कोणत्याही परिस्थितीत विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

१३) आरक्षणाचा लाभ घेणा–या उमेदवारांना ऑनलाईन अर्जासोबत जाती प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. तसेच या कार्यालयाने मागणी केल्यास शासकीय नियमाप्रमाणे आरक्षणा संबंधित कागदपत्रे सादर करणे उमेदवारास बंधनकारक राहील.

१४) शिकाऊ उमेदवारीचा प्रशिक्षण कालावधी पुर्ण केल्यामुळे कंपनीमध्ये नोकरी मिळवण्याचा कोणताही अधिकार प्राप्त होत नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

१५) निवड केलेल्या उमेदवारांनी जिल्हा शल्यचिकित्सालय, सांगली यांच्याकडुन वैद्यकीय दाखला देणे बंधनकारक आहे.

१६) कागदपत्रे तपासणी किंवा शिकाउ उमेदवार म्हणुन हजर होण्याकरिता कोणत्याही रक्कमेची पुर्तता असणार नाही.

१७) प्रशिक्षण कालावधीत कोणतीही निवासव्यवस्था कंपनीकडुन मागणी करता येणार नाही.

१८) सदर एस. एस.सी व आय.टी.आय. या गुणांना अनुक्रमे ५० व ५० टक्के गुणोत्तर देंउन त्यानुसार गुणवत्ता यादी तयार करणेत येईल,व त्यानुसार शासकीय व सामाजिक आरक्षणाचा लाभ देण्यास हे कार्यालय बांधिल असेल.

१९) आय.टी.आय. वीजतंत्री उमेदवार यांनीच अर्ज करावा. (डिप्लोमा/व्होकेशनल/वायरमन) कोर्स यांनी अर्ज भरू नये.

२०) शिकाउ उमेदवार भरती प्रक्रिया सांगली जिल्हयापुरतीच राहील.

२१) कागदपत्रे पडताळणी केल्यानंतर पुन:श्च गुणवत्ता यादी लावणेत येईल. त्यामध्ये जे पात्र उमेदवार ठरतील त्यांना शिकाउ उमेदवारीकरिता नियुक्ती देणेत येईल.

२२) आर्थिक दुर्बल घटक (EWS) व सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास प्रवर्ग (SEBC) या प्रवर्गाच्या उमेदवारांचे प्रमाणपत्र असणे आवश्यक असेल व या प्रवर्गाची निवड व प्रतिक्षा यादी याच प्रवर्गात असेल.

(एस.एम.पुजारी)
कार्यकारी अभियंता
अउदा संवसु विभाग, सांगली

## अउदा संवसु विभाग, सांगली

शिकाऊ उमेदवारी करीता आरक्षण तक्ता

| अजा | अज | विजा–अ | भज–ब | भज–क | भज–ड | विमाप्र | इमाव | आदुघ | साशैमाप्र | खुला | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १३% | ७% | ३% | २.५% | ३.५% | २% | २% | १९% | १०% | १०% | २८% | |
| ५ | ३ | १ | १ | १ | १ | १ | ७ | ४ | ४ | १० | ३८ |